उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, अमरावती महानगरपालिका, अमरावती कार्यालयाकरिता "कार्यालय प्रमुख" व "आहरण व संवितरण अधिकारी" घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र.नियुक्ती-१११५/१५७९/प्र.क्र.३५३/नवि-२७,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि. ०१ जानेवारी, २०१६.

वाचा :- १. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.विघयो-३८१५/२१/प्र.क्र.१०१/नवि-२७, दि.२६.०८.२०१५.
२. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.आस्था/उसंनर-अमरावती मनपा/प्रशा-१/६२७५, दि.०९.१०.२०१५.

प्रस्तावना :-

नगर विकास विभागाच्या **संदर्भ-१** येथील दि.२६.०८.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये अमरावती महानगरपालिकेची सुधारित विकास योजना तयार करण्यासाठी उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नाशिक महानगरपालिका, नाशिक येथील कार्यालय अमरावती महानगरपालिकेकडे स्थलातंरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदरचे कार्यालय दि.०१.०९.२०१५ पासून अमरावती येथे कार्यान्वित झाले आहे.

०२. सदर कार्यालयातील दैनंदिन कामकाज हाताळण्याकरिता व कार्यालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अदा करण्याकरिता उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, अमरावती महानगरपालिका, अमरावती यांना "कार्यालय प्रमुख" व "आहरण व संवितरण अधिकारी" घोषित करणेबाबत संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि.०९.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव पाठविलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत पुढीलप्रमाणे शासन आदेश देण्यात येत आहेत :-

शासन निर्णय :-

वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग-पहिला, उप-विभाग-एक, अ.क्र.३, नियम क्र.२ नुसार "उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, अमरावती महानगरपालिका, अमरावती" कार्यालयाकरिता "उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, अमरावती महानगरपालिका, अमरावती" यांना **"कार्यालय प्रमुख"** व महाराष्ट्र कोषागार अधिनियम, १९६८ च्या नियम १५ (३) नुसार "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०२. परिणामी संबंधित अधिकाऱ्याच्या नांवानिशी व त्यांच्या सहीच्या नमुन्यासह आवश्यक ते कार्यकारी आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावी.

०३. "उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, अमरावती महानगरपालिका, अमरावती" यांनी "कार्यालय प्रमुख" या नात्याने वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग-पहिला, उप-विभाग-एक, अ.क्र.३, नियम क्र.२ समोरील स्तंभ-६ मधील सर्व अटींचे पालन करावे.

०४. सदरचे आदेश वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/विनियम, दि.१५.०५.२००९ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेताक **२०१६०१०११७१७४६८८२५** असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Shriram Dattatraya Yadav

Digitally signed by Shriram Dattatraya Yadav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=50cb0ce4cc4fe54c74f42b86035 4e86ec00b3b36f5f215c9f7658e611006a200, cn=Shriram Dattatraya Yadav
Date: 2016.01.06 17:10:01 +05'30'

(श्री. द. यादव)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव.

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई. / महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
३. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई / नागपूर.
४. आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती.
५. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचानालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. **(३-प्रती)**
७. सह संचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती.
८. उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, अमरावती महानगरपालिका, अमरावती.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.
१०. कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवडनस्ती / (नवि-२७).

******